**निशाणी क्र.२१ खाली**

**<u>सरतपास अर्जदार क्र.१ तर्फे वकील खोब्रागडे यांचेमार्फत शपथेवर सुरू–</u>**

मी प्रतिज्ञापत्रातील मजकूर वाचला आहे. तो माझ्या सांगण्याप्रमाणे असून प्रतिज्ञापत्रावर माझी सही आहे. त्यामधील मजकूर बरोबर आहे. मी सदर प्रकरणात निशाणी क्र.४ प्रमाणे दस्ताऐवज दाखल केले आहेत, त्यांना निशाणी देण्यात येते. वेतन प्रमाणपत्रास गैरअर्जदार क्र. १ तर्फे विधीज्ञ श्री. जितेश वर्मा यांनी आक्षेपासह त्याला निशाणी देण्यात येणार नाही.

| | | |
|---|---|---|
| १. | ए.ए. फॉर्म | **– निशाणी क्र.२२** |
| २. | प्रथम खबर अहवाल | **– निशाणी क्र.२३** |
| ३. | घटनास्थळ पंचनामा | **– निशाणी क्र.२३** |
| ४. | क्राईम डिटेल्स फॉर्म | **– निशाणी क्र.२४** |
| ४. | इन्क्वेस्ट पंचनामा | **– निशाणी क्र.२५** |
| ५. | पोस्टमॉर्टम रिपोर्ट | **– निशाणी क्र.२६** |
| ६. | ड्रायव्हींग लायसन्स | **– निशाणी क्र.२७** |
| ७. | इन्शुरन्स पॉलिसी | **– निशाणी क्र.२८** |
| ८. | आर. सी. | **– निशाणी क्र.२९** |
| ९. | गुड्स परमिट | **– निशाणी क्र.३०** |
| १०. | कर पावती | **– निशाणी क्र.३१** |
| ११. | मृतकाचा वाहन चालविण्याचा परवाना | **– निशाणी क्र.३२** |
| १२. | अर्जदाराचा आधार कार्ड | **– निशाणी क्र.३३** |
| १३. | अर्जदाराचा पॅन कार्ड | **– निशाणी क्र.३४** |
| १४. | अर्जदार क्र. २ चा आधार कार्ड | **– निशाणी क्र.३५** |

**सरतपास पूर्ण.**
**उलटतपास गैरअर्जदार क्र.१ तर्फे विधीज्ञ श्री. जितेश वर्मा यांच्यामार्फत सुरू.**

**२.** माझया पतीची जन्म तारीख दि. २२/०२/१९६५ आहे. अपघाताच्या दिवशी ते ५७ वर्षाचे होते. अपघाताच्यावेळी ते जे मोटार सायकलचे त्याचे ते स्वत: मालक होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यांच्याकडे गाडीचे इंनश्युरेस नव्हते. ते कोणत्या कंपनीचे होते हे मला माहित नाही. त्याची प्रत दाखल केली नाही. मी अपघात स्थळावर गेली नव्हती. अपघात झाल्याचे मला माझया सास–याने सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पतीने हेल्मेट घातले नव्हते. हे म्हणणे नाही आहे की,माझे पति रेल्वेमध्ये कामाला होते व त्यांना रू. ४२,९०३/– एवढा पगार होता. हे म्हणणे खरे नाही की, माझे पति हयगयीने व निष्काळजीपणाने गाडी चालवत होते व त्यांच्या चुकीने सदरचा अपघात घडुन आला. हे म्हणणे खरे नाही की, मला पेंशन मिळत नाही. हे म्हणणे खरे नाही की,

मला रेल्वे कडुन नुकसान भरपाई मिळाली.

३. माझा मुलगा एम. एस. सी. एग्रीकल्चरमध्ये झालेला आहे. तो अंकुर शिड्समध्ये कामाला आहे व त्याचा मासिक वेतन १५,०००/- आहे. हे म्हणणे खरे आहे की, तो घर सांभाळतो. आमच्याकडे शेती नाही. मी गृहिणी आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

| | |
|---|---|
| वा.दा.ब.अ.क. केले. | माझ्या समक्ष |
| Digitally signed by BHARTI VASANT KALE Date: 2026.07.18 16:25:02 +0530 | Digitally signed by BHARTI VASANT KALE Date: 2026.07.18 16:25:10 +0530 |
| (भारती काळे) | (भारती काळे) |
| सदस्य | सदस्य |
| मोटार अपघात दावा प्रधिकरण, | मोटार अपघात दावा प्रधिकरण, |
| भंडारा. | भंडारा. |
| दिनांक: १८/०७/२०२६ | दिनांक: १८/०७/२०२६ |